म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
नं. ३०२

…ी ॥

# गणेश मेळा

## सन १९२५ सालचीं पदें

302



नमो श्रीगणेशा, न… हिंददेशा ।
… …ळती मनीषा ॥
… देशसेवा ।
…तंत्र्य मिळवा ॥

वंदेमातरम् ।

REFBK-0002835
REFBK-0002835

लेखक—बाळकृष्ण रामचंद्र जोशी, करंजगांवकर.

रंभीं सकल तुझें, करिती पूजन, गुणरुपगायन, विघ्ननिवारण ॥ ४॥ शरणागत या नम्रपणें, पावुनि सत्वरि भारत उद्धरि, दास्यविमोचन ॥ ५ ॥

REFBK-0002835

---

पद ३ रें.

वळें तोडीं रे ऽऽऽ—मनुजा ।
भवपाश साऽऽ...ऽरा ॥ धृ० ॥
देह हा बहु पीऽडिला। षड्रिपुनें ग्राऽसिला।
विवेका करी। मना आंवरी। हरितें स्मरा। निर्विकाऽऽरा ॥

---

पद ४ थें.

हरीची करणी। कोण आकळील तो ज्ञानी ॥ धृ० ॥

आकाश गौडबंगाल,
ही हवा वायुचें खूळ,
पृथ्विचे अंतरीं जळ,
पाठिवर पाणी ॥१॥

किति स्वयंप्रकाशित सूर्य,
तारका चकाकत चंद्र,
फिरवितो नेमिलें चक्र,
गोवुनी धरणी ॥२॥

भूवरी नद्या डोंगर।
मृत्तिका दगड खंगर।

# नेनेघाट गणेश मेळ्याचीं पदें.

सन १९२५.



पद १ लें.

नमन करीतो गौरी-कुमरा ।
नेनेघाट—गणेश—मेळा ॥
परराज्याचा पाश तुटाया ।
झटतों आम्हीं पडुनी पायां॥
कार्य करूं दे शक्ति अम्हांला
आशीर्वादहि मंगल बोला ॥
द नसो ही भिक्षा घाला ।
तोडीची बुद्धि यशाला ॥

पद २ रें.

गौरीनंदन, भो भवभंजन, गणराया । करितों वंदन ॥ धृ० ॥ असुरांपासुनि देवगणां, रक्षाया, वर जिंकाया, हरसी रावण ॥ १ ॥ वऱ्हाड आडवी गजअसुर, युद्ध करोनी, दैत्य मर्दुनी, सुखवी शिवजन ॥ २ ॥ अष्टसिद्धिशीं रममाण, वाह क, काल लुवाडक, दीनदयाघन ॥ ३ ॥ कार्या-

बहु प्रकार अवडंबर।
धातुंच्या खाणी ॥ ३ ॥
जीवजंतु अगणित जाती।
काय बीज कशी उत्पत्ति।
लय पावति होउनि माती।
चालली गिरणी ॥ ४ ॥

---

## पद ५ वें.

प्रेमें प्रणाम बोला। जनता-जनार्दनाला। सकलां ॥ धृ ॥
हरिश्चंद्र अभिमन्यू बाळा। प्रल्हाद धर्म पार्थाला सकला।
रामदास दामाजीला। शिवराज-टिळक–गांधी यांना।
धन्य त्या आणिक कितिकांला।
राखिति या परंपरेची माला ॥ १॥

---

## पद ६ वें.

ही झोळी नशिबीं आली। कैशी कालगती फिरली ॥ धृ० ॥
स्मरण होउनी भूतकालचें, कंठ दाटुनी येई।
कहाणी आजची वदतां वाचे, शब्दाचि उमटत नाहीं॥ १॥
कितिक वर्षिचा, देश आमुचा, काळ रोगराईचा।
ऋद्धिसिद्धिचा प्रांत गाजला, समर्थ–श्रीशिवबाचा॥ २॥
राज्य स्थापिलें, तख्त मिळविलें, दुष्ट रिपू संहारिले।

2634

गोब्राह्मण-प्रतिपालक त्यानें स्वधर्म-रक्षण केलें ॥ ३ ॥
धन-धान्याची किती विपुलता, गोरस दहिं दुध यांची ।
पुष्प-फळांची रेलचेल, ना वाण आप-तेजाची ॥ ४ ॥
वाणिग्वृत्ति राजाची सत्ता, अनिष्ट जरि ओढवली ।
जमिन राहिली हातीं अमुच्या, नाहिं निराशा झाली ।
वीज कराया या टाटानें तळीं बांधिलीं खाशीं ।
सत्य-आग्रहें विरोध केला, त्याचिच झाली सरशी ॥६॥
तोंड दाबुनी, ओघ नदीचा, उगम दिशेला फिरवी ।
असंतुष्ट मग कोण? कळेना, निसर्गदेवी उठवी ॥ ७ ॥
पाऊस पडुनी पाणी कोंडे, कुंडलिकेचें भारी ।
भिंत कडाडे! बांध कोसळे! भयाण वार्ता सारी! ॥ ८ ॥
ओघ विसरुनी, तुफान पाणी, आदळत आपटत जाई ।
खरडुनि जमिनी, गर्जत, झाडें दगड बरोबर घेई ॥ ९ ॥
धरणबंधनें गांवें उठतीं तळ्यांत जातीं जितकीं ।
खालिल गांवां या फुटण्यानें, अद्दल घडली पक्की ॥ १० ।
पिकें हरवलीं आज कुठकुठें पुन्हां शेतकी नाहीं ।
दुरुस्त होणें जमिन पूर्ववत् चिन्ह दिसेना कांहीं ॥ ११ ॥
मनुष्यहानी नाहिं फारशी, सूख मानिती लोक ।
आम्हांस वाटे 'वाहुन जाणें बरें, नको ही भीक.' ॥१२॥
काय ह्मणावें बरी शनीची नियमित साडेसाती ।
धरण नव्हे, ही सुरी लोंबती, कायम आम्हांवरती ॥१...
सावकार जे अशक्य त्यांना खास झेंपणें भार । ...ता ।

समर्थ असुनी सरकाराला, आमुची कळकळ फार ॥ १४

जाधवं प्रेमळ, हेर्गे कलेक्टर देती धन पोटाला ।
प्रळय भयंकर समक्ष पाहुनि उपकृत करिती सकलां ॥
बहुधा लावितील अन्नाला ॥ १५ ॥

तुम्हीं बंधुनो उदार होउनि साह्य करा या वेळा ।
हात जोडुनी नम्र विनवितों दीन मावळा बोला ॥ १६ ॥
ऐशी कालगती फिरली ॥ ध्रु० ॥

---

## पद ७ वें.

अजुन तरी आणा । धर्म-अभिमान-बाणा ॥ धृ० ॥

तुम्ही हिंदु असून । घेतां फजीत करून । सदा दैनट बनून ।
अगदीं कसे भिऊन परक्यांना ॥ १ ॥

आपला धर्म लई थ्वार । त्याचा वर्णविचार । रीती-भातीआचार ।
जोड जगामधें नाहिं जाणा ॥ २ ॥

एकदां आली होती । धाड धर्मावरती । मठ स्थापून देती ।
शंकराचार्य करिती रक्षणा ॥ ३ ॥

राजे मुसलमानी । आले हिंदुस्थानीं । ह्मणून त्यांचे तुम्ही ।
डोले पाहून करता ताबुतांना ॥ ४ ॥

इंग्लिश राज्य नामी । देव आपले कमी । बांधा चर्च तुम्हीं ।
उद्यां आणखी कुणी । येतिल त्यांच्या करणार उत्सवांना ॥ ५ ॥

---

१ मावळ मामलेदार; २ पुणें जि. चे.

802

मूर्ति फोडल्या किती । लोक बाटविती । छळ करून अती ।
गाई चरचर चिरती । त्यांची कृती ( कीर्ति ) कशी आठवांना ॥
पाहून यांचे चाळे । रामदास-बळें । शिवाजीनें भलें ।
कसें जर्जर केलें यवनांना ॥ ७ ॥

तरी त्यांचे ताबूत । करून नाचतां बहूत । मुलाबाळांसहित ।
‘ हायदोस दुल्ला ’ घालुन धिंगाणा ॥ ८ ॥

टिळकांनीं म्हणून । गणेशोत्सव काढून । ठेवलें साधन करून।
तरी ताबूतांचा मोह कांहो जाइना ॥ ९ ॥

धर्मामधें राहून । अन्न पोट भरून । मिळत नाहीं म्हणून ।
कोर्टामधें जाऊन । हिंदूबायांनीं अर्ज म्हणे केला १०

खरें ( आंतलें ) कोणास ठाऊक । बाया म्हणती बेशक । यवन
होऊन धडक । फार्स मासलेवाईक । जातो आम्हीं
परधर्माला ॥ बऱ्या गेलां नाहींत परलोकाला ॥ ११ ॥

हिंदुधर्म टाकून । शाबास पुन्हा जगून । अमर व्हावें म्हणून।
सांगा युक्ती अजब आयाबहिणींना ॥ १२ ॥

गांधी मोठा हिंदूंत । साधु असून जगांत । कशी भोंवली खिला-
पत । जिथें तिथें किंमत । हिंदूंपेक्षां देई मौलवींना ॥१३॥

याकरितां सारें । संघटन केलें । श्रद्धानंद बरें ।
पावन ( शुद्ध ) करून घेतात पतितांना ॥ १४ ॥

सगळी अस्पृश्यता । सोडून द्या रे आतां । आर्य-धर्म-हिता ।
करूं नका असला बावळटपणा ॥ १५ ॥

2035



आपल्याआपल्यामधें । वाद भलते भलते । उकरून काढती
भेदे (गद्धे) । डोकें ( अक्कल ) इकडे का जरा खर्चांना १६
नेनेघाट मेळा । हात जोडून सकळां । करी विनंतीला ।
स्व-धर्मे निधनम् श्रेयः ॥
गतोक्त धर्म आपला पाळा ॥ १७ ॥

---

पद ८ वें.

उमावरा शिवा हरा कृपा करोनि किंकरा ।
वरा असो करा त्वरा, अघाहरा श्रीशंकरा ॥
भवत्पदाविणें नसे अह्मां दुजाचि आसरा ।
म्हणोनि तारि, पामरा नरा न हेतु दूसरा ॥

वंदे मातरम् ।

समाप्त.

REFBK-0002835
REFBK-0002835

---

प्रकाशक—वासुदेव सदाशिव जोशी,
शनिवार १०८, पुणें शहर.
मुद्रक—अ. चिं. भट, यशवंत प्रेस, पुणें शहर.